नवराष्ट्र

# QUICK NEWS

## बोरकर यांची कार्यकारी संचालकपदी नियुक्ती

पुणे, (वा.) शिक्षण, आरोग्य व सामाजिक कल्याण या क्षेत्रात भारतातील अनेक राज्यात ना नफा तत्वावर काम करणाऱ्या इंडियाआशा फौंडेशन या सामाजिक संस्थेने सामाजिक क्षेत्रातील अनुभवी व्यक्ति सुजाता बोरकर यांची उत्तर पश्चिम महाराष्ट्र शाखेच्या कार्यकारी संचालकपदी नियुक्ती केल्याची घोषणा केली. बोरकर यांनी दोन दशकाहून अधिक काळापासून तळागाळातील विविध सामाजिक समस्या हाताळण्याचे काम केले असून एक दशकाहून अधिक काळापासून त्या इंडियाआशा फौंडेशनसोबत काम करत आहे. त्यांची सामाजिक बदलाची आवड लक्षात घेऊन इंडिया आशा फौंडेशनने अनेक प्रभावशाली सामाजिक उपक्रम सकारात्मसक परिणामांसह सुरु केले. बोरकर यांच्या संचालकपदी झालेल्या नेमणुकीमुळे इंडिया आशा फॉंडेशनतर्फे अनेक सामाजिक उपक्रम पुन्हा नव्या जोमाने सुरु होत आहेत.

Pune Edition
10 June 2022 Page No. 2
epaper.navarashtra.com